# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.03.2025** **वार- मंगळवार**

---

**साखर कारखाना**

यंदा सरासरी गाळप हंगामाचा कालावधी 83 दिवसांवर आल्याने त्याचा विपरीत आर्थिक परिणाम दिसून येत असल्याचं मत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी नोंदवलं आहे. गाळप हंगामाचा कालावधी सर्वसाधारणपणे 140 ते 150 दिवसांचा असणं आवश्यक असतं, मात्र हा कालावधी कमी झाल्यामुळे सुमारे 80 लाख टन साखरेचं उत्पादन होण्याची शक्यता आहे, त्यामळे संपूर्ण साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडला असल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं आहे.

**दूध उत्पादक**

राज्य सरकारने गायीच्या दुधाला घोषित केलेल्या प्रतिलिटरला पाच रुपये आणि सात रुपयांप्रमाणे दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या देय अनुदानासाठी 339 कोटी 15 लाख रुपये दुग्धव्यवसाय विभागाच्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. ही अनुदान रक्कम दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ऑनलाइन जमा करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे दुग्धव्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिली. या योजनेचा लाभ सुमारे सात ते साडेसात लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

**मिळकत कर स्थगिती**

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेल्या 23 गावांच्या मिळकतकर आकारणीला राज्य सरकारने स्थगिती दिली आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात या गावांना मिळकतकर बिलाचे वाटप होणार नसल्याचे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी सांगितलं. या गावात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 250 कोटी रुपयांचा निधी द्यावा अशी मागणी महापालिकेतर्फे करण्यात आली असल्याचं आयुक्त डॉक्टर भोसले यांनी सांगितलं.

**GBS**
सध्या गुलेन-बॅरी सिंड्रोम म्हणजे जीबीएस हा आजार आटोक्यात आल्याचं दिसून येत आहे. दूषित पाणी आणि अन्नातून ‘जीबीएस’चा प्रसार होत असल्याचे स्पष्ट झाले असून याबाबतचा अहवाल सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केला आहे. पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं पाणी आणि संबंधित घटकांचे नमुने संकलित केले होते. त्यापैकी  पाण्याचे 139 आणि पोल्ट्रीचे 28 नमुने दूषित आढळून आले आहेत. सिंहगड रस्ता परिसरात जीबीएसचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले होते.

**नवीनगावे - जलशुद्धीकरण प्रकल्प**
पुणे महापालिकेतर्फे, महापालिकेत समाविष्ट झालेल्या खडकवासल्याजवळील नवीन गावांसाठी स्वतंत्र जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.  नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये प्रक्रिया न केलेले पाणी देण्यात येत असल्याचे समोर आले होते,  त्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शंभर दशलक्ष लिटर क्षमतेचा स्वतंत्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून यासाठी सुमारे अडीचशे कोटी रुपये खर्च येणार असल्याचं डॉक्टर भोसले यांनी सांगितलं.

**पुणे-बंदोबस्त**
नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. तसंच  राज्य राखीव पोलिस दलाची एक तुकडी तैनात करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेशकुमार आणि सह आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**सीसीटीव्ही**
राज्याच्या  शहरी भागांतील सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी  सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसंदर्भात सर्वसमावेशक धोरण विकसित केले जाईल, असं  आश्वासन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत दिलं. आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते. पुणे शहरात सुमारे दहा हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, यापैकी अनेक कॅमेरे बिघडलेले आहेत. त्यामुळे  सुरक्षिततेचे गंभीर विषय निर्माण होउ शकतात, याकडे आमदार शिरोळे यांनी लक्ष वेधलं.

**रिक्षा धारक अनुदान**

राज्य शासनाच्या ई  वाहन धोरणांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सात  ई-रिक्षा धारकांना  महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते प्रत्येकी  30 हजार रुपये अनुदानाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आलं.

**रंगत संगत पुरस्कार**

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'काव्य जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री वर्षा कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे.  'वृत्तबद्ध कविता : कला आणि शास्त्र' या ग्रंथाच्या त्या लेखिका असून या ग्रंथाची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीच्या पहिल्या वर्षासाठीच्या अभ्यासक्रमात संदर्भग्रंथ म्हणून निवड करण्यात आली आहे.

**कविता स्पर्धा**

रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे परदेशातील 5  ते 14  वयोगटातील मुलांसाठी मराठी कविता सादरीकरण स्पर्धेचं आयोजन करण्यात असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत वझे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवली आहे.  या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलांनी 5 एप्रिलपर्यंत कविता सादरीकरणाचा व्हिडीओ पाठवावा,  असं आवाहन करण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 38 तर किमान 16 पूर्णांक 70 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या देखील साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता , ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**